# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 05 May 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०५ मे २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- राज्याचा बारावीचा निकाल सुमारे ९२ टक्के–छत्रपती संभाजीनगर विभागातून बीड प्रथम तर लातूर विभागातून धाराशिव अव्वल
- शासनाच्या टेकवारी उपक्रमाला आजपासून प्रारंभ–नऊ मे पर्यंतच्या प्रशिक्षण आठवड्यात विविध उपक्रमांचं आयोजन
- पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चिनाब नदीवरल्या बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी अडवण्याचा भारताचा निर्णय
- वक्फ सुधारणा कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात १५ मे रोजी सुनावणी

आणि

- मराठवाड्याच्या अनेक भागात गारपिटीसह अवकाळी पावसाची हजेरी

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. परीक्षेचा एकूण निकाल ९१ पूर्णांक ८८ शतांश टक्के इतका लागला आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९७ पूर्णांक ३५ शतांश टक्के, कला शाखेचा ८० पूर्णांक ५२ शतांश टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ९२ पूर्णांक ६८ शतांश टक्के इतका लागला आहे. राज्यात कोकण विभागाचा निकाल ९६ पूर्णांक ७४ शतांश टक्के लागला असून हा विभाग पुन्हा एकदा अव्वल स्थानी आला आहे. त्यापाठोपाठ मुंबई विभागाचा निकाल ९२ पूर्णांक ९३ शतांश टक्के लागला आहे, पुणे ९१ पूर्णांक ३२ शतांश टक्के, नागपूर ९० पूर्णांक ५२, छत्रपती संभाजीनगर ९२ पूर्णांक २४,

कोल्हापूर ९३ पूर्णांक ६४, अमरावती ९१ पूर्णांक ४३, नाशिक ९१ पूर्णांक ३१, तर लातूर विभागाचा निकाल सर्वात कमी म्हणजे ८९ पूर्णांक ४६ शतांश टक्के इतका लागला आहे. सर्व विद्यार्थ्यांना उद्यापासून महाविद्यालयात गुणपत्रिका मिळणार असल्याची माहिती, मंडळानं दिली आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून ९२ पूर्णांक ९० शतांश टक्के परीक्षार्थी उत्तीर्ण झाले, बीड ९३ पूर्णांक ७३ शतांश, जालना ९० पूर्णांक १० शतांश, परभणी ८४ पूर्णांक ५३ शतांश, तर हिंगोली जिल्ह्याचा ८६ पूर्णांक शून्य सहा शतांश टक्के निकाल लागला आहे.

लातूर विभागातून ८९ पूर्णांक ४६ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले, लातूर जिल्ह्याचा निकाल ८६ पूर्णांक ३८ शतांश टक्के लागला असून, नांदेड जिल्ह्याचा निकाल ९० पूर्णांक ८२ शतांश टक्के तर धाराशिव जिल्ह्याचा निकाल ९२ पूर्णांक ३२ शतांश टक्के लागला आहे.

****

शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी परीक्षेत यश मिळविलेले विद्यार्थी, त्यांचे पालक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांनी आवड आणि कल पाहून पुढील मार्ग निश्चित करावेत, ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही त्यांनी नव्या उमेदीनं अभ्यासाला लागावं आणि यश संपादन करावं, असं ते म्हणाले.

****

दरम्यान,राज्यात गैरप्रकार आढळलेल्या तीनहजार ३७३ केंद्रांपैकी १२४ केंद्राची चौकशी होणार असल्याची माहिती शरद गोसावी यांनी दिली. या चौकशी दरम्यान त्रुटी आढळल्यास या केंद्रांवर कारवाई करून कायमस्वरूपी बंद करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. छत्रपती संभाजीनगर विभागात २१४, तर लातूर विभागात ३७ कॉपी प्रकार उघडकीस आले आहेत.

****

शासनाच्या टेकवारी उपक्रमाला आजपासून प्रारंभ झाला. मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या उपक्रमाचं उद्घाटन झालं. राजकीय कार्यसंस्कृती सक्षम करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांचं मोठं योगदान असून टेकवारी उपक्रमामुळे राज्यातलं मनुष्यबळ अधिक तंत्रकुशल, गतिमान, पारदर्शक आणि जबाबदार होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी व्यक्त केला. प्रशासकीय

अधिकारी–कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी, प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी टेक वारी हा प्रशिक्षण आठवडा आजपासून येत्या ९ मे दरम्यान साजरा करण्यात येणार आहे. याविषयी अधिक माहिती ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून –

**बाईट – सुनील कांबळे, मुंबई**

****

लोकलेखा समितीचं आज पुनर्गठन करण्यात आलं. या समितीच्या अध्यक्षपदी काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल यांची नियुक्ती करण्यात आली असून समितीचा कार्यकाळ ३० एप्रिल २०२६ पर्यंत राहील. १९६७ पासून सुरु झालेली ही लोकलेखा समिती नियंत्रक आणि महालेखापालांच्या अहवालांचं परीक्षण करते. तसंच सरकारी योजना आणि खर्चाचा अभ्यास करते.

****

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चिनाब नदीवरल्या बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी अडवण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे. तसंच झेलम नदीवरल्या किशनगंगा धरणाचं पाणी रोखण्याचा विचारही भारत करत असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत संरक्षण सचिव राजेश कुमार यांच्याशी महत्त्वपूर्ण चर्चा केल्याचं वृत्त आहे.

****

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलेल्या आणि दहशतवाद्यांना मदत केलेल्या इम्तियाझ अहमद मगरे या कुलगाम जिल्ह्यातील युवकानं आज नदीत उडी मारली यात त्याचा मृत्यू झाला. इम्तियाझने दहशतवाद्यांसाठी जेवणाची आणि अन्य व्यवस्था केली होती, त्यानं स्वत: हे चौकशी दरम्यान कबूल केलं होतं. त्याला संबंधित ठिकाणांवर घेऊन जात असताना त्याने नदीत उडी मारली, त्यात त्याचा मृत्यू झाल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

दरम्यान, पहलगाम हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी कारवाई अधिक तीव्र केली असून जम्मू काश्मीरमधील पूंछ जिल्ह्यात सुरनकोट क्षेत्रात सुरक्षा दलानं दहशतवाद्यांचा एक मोठा कट उधळून लावला. या क्षेत्रात दहशतवादी विरोधी अभियानाअंतर्गत

सुरक्षा दलानं केलेल्या संयुक्त कारवाईत जंगलातील दशतवाद्यांचा तळ नष्ट केला. यावेळी पाच आयईडीसह अन्य दारूगोळा आणि सामग्री जप्त करण्यात आली.

****

राज्य दहशतवाद विरोधी पथकानं नक्षली कारवाया करणाऱ्या, रायगड जिल्ह्यातल्या एका नक्षलवाद्याला पुण्यातून अटक केली आहे. प्रशांत कांबळे असं त्याचं नाव असून गेली १३ वर्ष तो भूमिगत होता. सुमारे दहा वर्षांपूर्वी केलेल्या एका नक्षली कृत्यासाठी तो हवा होता.

****

वक्फ सुधारणा कायदा २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आता येत्या १५ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्यासह न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या पीठासमोर आज सुनावणी होणार होती. मात्र आपण लवकरच सेवानिवृत्त होणार असल्यानं ही सुनावणी भावी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या पीठासमोर होईल, असं सांगून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी पुढची तारीख दिली आहे. या संदर्भात यापूर्वी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयानं काही मुद्यांवर चिंता व्यक्त केल्यानंतर केंद्र सरकारनं कायद्यातल्या काही तरतुदींना स्थगिती दिली आहे. नोंदणीकृत आणि अधिसूचित वक्फ मालमत्ता तसंच वापरकर्त्यांकडून वक्फ घोषित झालेल्या जमिनींच्या सद्यस्थितीवर कोणताही परिणाम होणार नाही, अशी ग्वाही केंद्र सरकारनं दिली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात बहुतांश भागात आज गारपिटीसह अवकाळी पाऊस झाला. बीड जिल्ह्यात अंबाजोगाई शहर आणि परिसरात मेघगर्जनीसह गारांचा पाऊस झाला, अवकाळी पावसामुळे आंब्याचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची भीती वर्तवण्यात येत आहे.

जालना शहरासह जिल्ह्यात सर्वत्र वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. काही भागात बोरांच्या आकाराच्या गाराही पडल्या. या अवकाळी पावसामुळे आंबा फळपिकासाह कांदा बियाणे, उन्हाळी बाजरी, मका आणि इतर पिकांचे नुकसान झाल्याचं आमच्या वारताहरानं कळवलं आहे.

नाशिक जिल्ह्यातल्या मनमाड शहरात गारपिटीसह पाऊस झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

दरम्यान, राज्यात काल सर्वाधिक ४२ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस तापमान वाशिम इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर इथं ३९ अंश तर परभणी इथं ४१ पूर्णांक सात अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****

खरीप हंगाम २०२५–२६ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ६ लाख ८९ हजार ४१ हेक्टर पेरणी क्षेत्र प्रस्तावित असून त्यासाठी ७१ हजार ५२८ क्विंटल बियाण्यांची मागणी असून ३ लाख ९१ हजार १८९ मेट्रीक टन रासायनिक खताची मागणी असून ३ लाख १ हजार ४६८ मेट्रीक टन इतके वाटप मंजूर झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली. जिल्हा कृषी निविष्ठा संनियंत्रण समितीची बैथकीत ते आज बोलत होते.शेतकऱ्यांसाठी पुरेशा व दर्जेदार कृषी निविष्ठा उपलब्धतेचे कृषी विभागाने नियोजन करण्याचे निर्देश स्वामी यांनी यंत्रणांना दिले.

****

भंडारा जिल्हातील लाखनी शहरात आयपीएल क्रिकेट सामन्यांवर सट्टेबाजी करणाऱ्या चौघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतलं. चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरु यांच्यातील सामन्यावर ही टोळी सट्टा लावत होती. या कारवाईत २ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.
दरम्यान, आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स या संघात आज सामना होणार आहे. हैदराबाद इथं संध्याकाळी साडे सात वाजता खेळाला सुरुवात होईल.

****